जाहिरात तारीख – ०७/१२/२०२३
अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख – २०/१२/२०२३

## जाहिरात

जिल्हा न्यायालय, रायगड अलिबाग यांच्या आस्थापनेवरील रिक्त असलेल्या एका पुस्तक बांधणीकार पदाकरीता उमेदवाराची निवड करावयाची असून, सदर पदाच्या जागेकरीता पात्र उमेदवारांकडून या जाहिरातीद्वारे खाली नमुद केलेल्या नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. पात्र उमेदवारांना या सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये सुवाच्य अक्षरात/टंकलिखीत करुन लिफाफ्यावर "पुस्तक बांधणीकार पदाकरीता अर्ज" असे लिहून प्रबंधक, जिल्हा न्यायालय, रायगड अलिबाग यांचे नांवे अर्ज करुन तो दिनांक २०/१२/२०२३ रोजी अगर त्यापूर्वी जिल्हा न्यायालय, रायगड अलिबाग येथे पोहोचतील असे नोंदणीकृत पोच देय डाकेने (Registered Post A.D.) किंवा स्पीड पोस्टने (Speed Post) पाठवावेत, अन्य मार्गाने आलेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. तसेच वर नमुद केलेल्या अंतीम तारखेनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

### निवड करावयाच्या जागेचा तपशिल.

| | | |
|---|---|---|
| १. | पदांची संख्या | १ (एक) |
| २. | पात्रता व अटी. | शरीर प्रकृती सुदृढ असावी, सदर पदाचे कर्तव्य पार पाडण्यास पात्र असावा व कमीतकमी सातवी इयत्ता उत्तीर्ण असावा. |
| | | उमेदवाराला विविध प्रकारच्या पुस्तक बांधणीचे ज्ञान असावे. |
| | | उमेदवाराला पुस्तक बांधणीसंबंधित यांत्रिक साधने / उपकरणे चालविण्याचे पुरेसे ज्ञान असावे.<br>ज्या कर्मचाऱ्याने औद्योगिक प्रशिक्षक संस्था अथवा मान्यताप्राप्त संस्थेतून पुस्तक बांधणीचा अभ्यासक्रम पुर्ण केला असल्यास त्यास प्राधान्य देण्यात येईल. |
| | | उमेदवाराला पुस्तक बांधणीची आवड असावी. |
| ३. | वयोमर्यादा. | या जाहिरातीच्या दिवशी उमेदवार १८ वर्षापेक्षा कमी वयाचा नसावा आणि सर्वसाधारण प्रवर्गाकरीता ३८ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा. मागासवर्गीय असल्यास ४३ वर्षापेक्षा जास्त नसावा.<br>शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही १०७७/३५३६/१४३३/१६-अ, दिनांक २३/०५/१९७८ नुसार शारिरीक दृष्ट्या अपंग व्यक्ती, जर त्या अन्यथा योग्य व सदर पदाची कर्तव्ये पार पाडण्याकरीता सक्षम असतील तर, त्यांच्याबाबतीत सेवाप्रवेशासाठी विहित केलेली उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथील केलेली आहे. न्यायालयीन कर्मचारी किंवा शासकीय कर्मचारी यांना वयाची अट नाही. |
| ४. | वेतनश्रेणी. | वेतनस्तर एस.५, वेतन मॅट्रिक्स १८००० – ५६९०० वेतन व नियमानुसार अनुज्ञेय भत्ते. |

## उमेदवारांना सुचना.

१. जे अर्जदार शासकीय सेवेत आहेत त्यांनी त्या त्या विभाग/कार्यालय प्रमुखांची लेखी परवानगी घेऊनच अर्ज करावा. परवानगीची साक्षांकीत/स्वसाक्षांकीत प्रत अर्जासोबत सादर करावी व मुळ प्रत मुलाखतीच्या वेळी सादर करावी. अर्जदारांनी अर्ज आपापल्या विभाग/कार्यालय प्रमुखामार्फत पाठविण्याची आवश्यकता नाही.

२. अर्जदारांनी सुवाच्य अक्षरात / टंकलिखित अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराने अर्जासोबत स्वतःचा पत्ता लिहिलेला व रु. ५/- चे पोस्टाचे तिकीट लावून त्यावर स्वतःचा पत्ता लिहीलेला लखोटा जोडणे आवश्यक आहे.

३. विहित नमुन्यात नसलेले / अर्जदाराची सही नसलेले / अपूरी माहिती असलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व ते अवैध समजून फेटाळण्यात येतील.

४. दिनांक २०/१२/२०२३ नंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

५. अर्जदाराने अर्जासोबत शैक्षणिक पात्रता दर्शविणाऱ्या दाखल्यांच्या साक्षांकीत/स्वसाक्षांकीत प्रती अर्जासोबत सादर कराव्यात व मुळ प्रती मुलाखतीच्या वेळी सादर कराव्यात.

६. अर्जदाराने अर्जासोबत जन्मतारीख दर्शविण्यासाठी शाळासोडल्याचा दाखला/जन्मतारखेचा दाखल्याची साक्षांकीत/स्वसाक्षांकीत प्रत अर्जासोबत सादर करावी व मुळ प्रत मुलाखतीच्या वेळी सादर करावी.

७. अर्जदाराने अर्जासोबत आधार कार्ड/पॅनकार्ड यांची साक्षांकीत/स्वसाक्षांकीत प्रत अर्जासोबत सादर करावी व मुळ प्रत मुलाखतीच्या वेळी सादर करावी.

८. अर्जदार मागसवर्गीय असल्यास तो कोणत्या प्रवर्गातील आहे हे स्पष्टपणे नमुद करावे. जातीच्या दाखल्याची साक्षांकीत/स्वसाक्षांकीत प्रत अर्जासोबत सादर करावी व मुळ प्रत मुलाखतीच्या वेळी सादर करावी.

९. अर्जदार जर अपंग असेल तर उमेदवाराने अपंगत्वाच्या दाखल्याची साक्षांकीत/स्वसाक्षांकीत प्रत अर्जासोबत सादर करावी व मुळ प्रत मुलाखतीच्या वेळी सादर करावी.

१०. अर्जदाराने कमीत कमी शैक्षणीक पात्रता व इतर अटी जरी पूर्ण केल्या असतील तरी देखील जर त्यापेक्षा जास्त पात्रतेचे उमेदवार जास्त संख्येने उपलब्ध झाल्यास, अशा जास्त पात्रतेच्या अर्जदारानाच मुलाखतीस बोलविण्याचा अधिकार राखून ठेवण्यात येत आहे.

११. अर्जदाराने त्याचा/तिचा अलिकडचा पासपोर्ट आकाराचा एक फोटो अर्जाच्या वरच्या बाजूस उजव्या कोपऱ्यात लावून त्यावर अशा प्रकारे स्वाक्षरी करावी की त्यातील काही भाग फोटोवर आणि काही भाग अर्जावर सुध्दा येईल. तसेच अर्जासोबत दिलेल्या नमुन्यात

ओळखपत्रावर आपले नांव, पत्ता व मोबाईल नंबर दिलेल्या जागी लिहून पासपोर्ट आकाराचा एक फोटो उजव्या कोपऱ्यात लावून त्यावर अशा प्रकारे स्वाक्षरी करावी की त्यातील काही भाग फोटोवर आणि काही भाग ओळखपत्रावर सुध्दा येईल.

१२. अर्जदाराने स्वतःच्या निवडीसाठी कोणत्याही प्रकारचे दडपण आणल्याचे निदर्शनास आल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल. तसेच अर्जदाराने अपूर्ण अथवा चुकीची माहिती दिलेली आढळल्यास त्यांना निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल. या बाबतीत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

१३. अर्जदारास कोणत्याही न्यायालयाने फौजदारी गुन्ह्यात दोषी ठरविलेले नसावे किंवा त्याच्या विरुध्द फौजदारी खटला प्रलंबित नसावा.

१४. अल्पसूचीबध्द उमेदवारांना प्रात्यक्षिक परीक्षेची / मुलाखतीची तारीख, वेळ व जागा नंतर कळविण्यात येईल.

१५. अर्जदारांची २० गुणांची पुस्तक बांधणी बाबतची प्रात्यक्षिक चाचणी परीक्षा घेण्यात येईल. प्रात्यक्षिक परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी सदर परीक्षेत उमेदवारांना कमीत कमी ०७ गुण मिळणे आवश्यक आहे. तसेच सदर परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची २० गुणांची तोंडी मुलाखत घेण्यात येईल.

१६. अर्जदारांना परीक्षेसाठी / मुलाखतीसाठी स्वखर्चाने हजर रहावे लागेल.

१७. भरती प्रक्रियेच्या वेळी पत्रकात काही बदल झाल्यास किंवा अन्य महत्वाची सूचना असल्यास त्याची माहिती जिल्हा न्यायालयातील कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच जिल्हा न्यायालयाच्या अधिकृत संकेत स्थळ https://raigad.dcourts.gov.in वर प्रसिध्द करण्यात येईल. त्याकरीता अर्जदारांनी सदरहू संकेतस्थळावर लक्ष ठेवावे. तो बदल वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही.

१८. उमेदरावाच्या निवडीनंतर या प्रक्रियेचा निकाल फक्त जिल्हा न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१९. ओळखपत्र असल्याशिवाय प्रात्यक्षिक परीक्षा किंवा मुलाखतीस प्रवेश देण्यात येणार नाही.

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, रायगड–अलिबाग

# भाग – १
## "पुस्तक बांधणीकार या पदासाठी"
## अर्जाचा नमुना

येथे अलिकडचा पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवावा

१) अर्जदाराचे पूर्ण नाव :
२) पूर्ण पत्ता :
पिन कोड नंबर :
मोबाईल नंबर :
३) जन्मतारीख :
४) अर्जदाराचे वय (दि. ०७/१२/२०२३ रोजी) :
५) शैक्षणिक पात्रता :
६) उमेदवार मागासवर्गीय असलयास तो कोणत्या प्रवर्गातील आहे हे स्पष्टपणे नमूद करावे. :
७) उमेदवार शारिरीकदृष्ट्या अपंग असलयास तसे स्पष्टपणे नमूद करावे. :
८) अर्जदाराचे जवळचे नातेवाईक या जिल्ह्यातील न्यायालयात अगर अन्य न्यायालयात सेवेत आहेत का ? असल्यास त्याचा तपशिल :
९) अर्जदार विवाहीत / अविवाहीत आहे का ? :
१०) पुर्वानुभव :

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करतो / करते की, मला शासकीय सेवेकरिता अपात्र घोषीत केलेले नाही. मला फौजदारी गुन्ह्यात अटक किंवा शिक्षा झालेली नाही आणि माझे विरुध्द कोणत्याही फौजदारी न्यायालयात खटला प्रलंबित नाही.

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करतो / करते की, अर्जात नमूद केलेली माहिती माझ्या माहितीनुसार खरी व बरोबर आहे, त्यातील कोणतीही गोष्ट खोटी / चुकीची आढळल्यास मला निवड प्रक्रियेमधून अपात्र घोषीत केले जाईल आणि जर निवड / नेमणूक झाल्यास, माझी सेवा कोणतीही नोटीस (सूचना) दिल्याविना सेवा समाप्त केली जाईल.

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करतो / करते की, आज रोजी मला .......................... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८/०३/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ........ आहे. (असल्यास, जन्म दिनांक नमूद करावा)

हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८/०३/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र ठरेल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :
दिनांक : (अर्जदाराचे नांव व सही)

पुस्तक बांधणीकार सेवाप्रवेश, २०२३ करीता

येथे अलिकडचा
पासपोर्ट आकाराचा
फोटो चिकटवावा

## ओळखपत्र

नोंदणीक्रमांक –

१) अर्जदाराचे नांव :– ............................................................................

२) पूर्ण पत्ता पिनकोडसहीत :– ..................................................................

..................................................................

पिनकोड क्रमांक ..................

३) मोबाईल नंबर :–

निर्गमित करणारा अधिकारी